लोकमत

# आजपासून 'कृषी विपणन' परिषद

कोल्हापूर : हैदराबाद येथील द इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल मार्केटिंग आणि शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागातर्फे सोमवार ते बुधवारदरम्यान कृषी विपणन विषयावर राष्ट्रीय परिषद होणार आहे. राजर्षी शाहू सभागृहातील या परिषदेत अर्थतज्ज्ञ डॉ. अशोक दलवाई बीजभाषण करणार आहेत. कृषिमूल्य आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. एस. महेंद्र देव, नाबार्डचे मुख्य सरव्यवस्थापक डॉ. सत्यसाई मार्गदर्शन करणार आहेत. रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर डॉ. उषा थोरात, जागतिक बँकेचे अर्थतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर रानडे आदी उपस्थित असणार आहेत, अशी माहिती समन्वयक डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी दिली.

14 NOV 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या 'सिनेट'साठी आज मतदान

## तीन जिल्ह्यांत ३३ केंद्रे असणार : पन्नास जागा असणार; बुधवारी होणार मतमोजणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : दक्षिण महाराष्ट्राची ज्ञानगंगा असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) आणि विविध अधिकार मंडळांच्या ५० जागांसाठी आज, सोमवारी सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत मतदान होणार आहे. या जागांसाठी १०० उमेदवार रिंगणात आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील एकूण ३३ केंद्रांवर नोंदणी पदवीधर, शिक्षक असे ३६,९८३ जण मतदानाचा हक्क बजावणार आहेत. गेल्या १६ दिवसांपासून सुरू असलेल्या विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि शिव-शाहू आघाडीच्या प्रचाराची रणधुमाळी रविवारी सायंकाळी थांबली.

विकास आघाडीने गेल्या निवडणुकीत वर्चस्व मिळविले होते. ते यंदाही कायम राखण्यासाठी या आघाडीने जोरदार ताकद लावली आहे. या आघाडीला टक्कर देण्यासाठी सुटाने शिव-शाहू आघाडीच्या माध्यमातून पाऊल टाकले. त्यामुळे नोंदणीकृत पदवीधर, शिक्षक गटात चुरस निर्माण झाली. मतदानासाठी रविवारी अधिकाऱ्यांचा ताफा निवडणूक साधनसामग्रीसह रवाना झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी यावेळी उपस्थित होते.

### प्रत्येक केंद्रावर दोन्ही आघाडींच्या टीम...

- पाच शिक्षक, तीन प्राचार्य अशी ७ जणांची टीम प्रत्येक केंद्रावर असणार आहे.
- पदाधिकारी, उमेदवार या प्रत्येक केंद्राला भेटी देणार असल्याचे विकास आघाडीचे सहसचिव डॉ. व्ही. एम. पाटील यांनी सांगितले. बूथनिहाय पदाधिकारी, सभासदांचे नियोजन केले आहे.
- उमेदवार तिन्ही जिल्ह्यांत फिरणार असल्याचे सुटाचे प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी सांगितले.

### मतदारांसाठी हे महत्त्वाचे...

ज्या केंद्रामध्ये नाव आहे, त्याठिकाणी जाऊन पात्र मतदारांनी मतदान करायचे आहे. त्यांनी पसंतीक्रम मराठी अथवा इंग्रजीमध्ये नोंदवायचा आहे. सिनेटमधील शिक्षक, पदवीधर प्रवर्गातील १९ जागांसाठी ४५ उमेदवार असल्याने एका प्रवर्गाची एक मतपत्रिका प्रत्येकी चार पानांची असणार आहे. मतदारांकडे निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट, वाहन परवाना, पॅनकार्ड, आधार कार्ड, आदी ११ पैकी एक ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसाठी आज तीन जिल्ह्यांत मतदान

लोकसत्ता प्रतिनिधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळासाठी उद्या सोमवारी कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांतील ३३ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि शिवशाहू आघाडी यांच्यामध्ये हा सामना रंगला आहे.

या निवडणुकांसाठी रविवारी १७० केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचा ताफा निवडणूक साधनसामग्रीसह रवाना झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदींच्या प्रमुख उपस्थितीत २५ वाहने ठिकठिकाणी रवाना झाली.

अधिकार मंडळावर वर्चस्व मिळवण्यासाठी विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि शिवशाहू आघाडीने कंबर कसली आहे. विद्यापीठ विकास आघाडीने प्राचार्य व संस्थाचालक गटातील १६ पैकी १३ जागा बिनविरोध झाल्या आहेत. आघाडीचेच वर्चस्व होईल, असे आघाडी प्रमुख डॉ. संजय डी. पाटील, सचिव डॉ. व्ही. एम. पाटील यांनी म्हटले आहे. तर निवडणुकीत प्रथमच उतरणाऱ्या ठाकरे सेना, डाव्या पक्षांच्या शिवशाहू आघाडीचा कितपत प्रभाव राहणार याचाही या निमित्ताने फैसला होणार आहे.

पुढारी

# 'कृषी विपणन'वर अर्थशास्त्र विभागात आजपासून राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

हैदराबाद येथील द इंडियन सोसायटी ऑफ अ‍ॅग्रीकल्चरल मार्केटिंग व शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान कृषी विपणन विषयावरील ३६ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या परिषदेची तयारी पूर्ण झाल्याची माहिती राष्ट्रीय परिषदेचे समन्वयक व अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी दिली.

कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारंभ होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील उपस्थित राहणार आहेत. भारत सरकारचे केंद्रीय सचिव तथा नॅशनल रेनफेड एरिया प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. अशोक दलवाई राष्ट्रीय परिषदेत बीजभाषण करणार आहेत. कृषिमूल्य आयोगाचे माजी अध्यक्ष तथा द इंडियन सोसायटी ऑफ अ‍ॅग्रीकल्चर मार्केटिंगचे अध्यक्ष प्रा. एस. महेंद्र देव राष्ट्रीय परिषदेची संकल्पना मांडणार आहेत. नाबार्डचे मुख्य सरव्यवस्थापक डॉ. सत्यसाई हे अर्थतज्ज्ञ प्रो. जी. पार्थसारथी मेमोरिअल लेक्चर देणार आहेत. रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर डॉ. उषा थोरात, जागतिक बँकेचे अर्थतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर रानडे परिषदेस उपस्थित राहणार आहेत.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसाठी आज मतदान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसाठी सोमवारी (दि. १४) निवडणूक होत आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील ३३ केंद्रांवर सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने निवडणुकीची तयारी पूर्ण केली आहे. पदवीधरसाठी ३६,३४३, तर शिक्षकसाठी ६४० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. विद्यापीठाने या दिवशी सुट्टी जाहीर केली आहे.

(सविस्तर वृत्त पान ५)

# शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळांसाठी आज मतदान

## निवडणूक साधनसामग्रीसह अधिकारी रवाना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसाठी सोमवारी (दि. १४) निवडणूक होत आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील ३३ केंद्रांवर सकाळी ९ ते सायं. ५ या वेळेत मतदान होईल.

विद्यापीठ विकास आघाडी, 'सुटा', शिव-शाहू आघाडीसह अपक्ष उमेदवार शिक्षक, विद्या परिषद, पदवीधरसाठी रिंगणात आहेत. यंदा पदवीधर मतदारांची संख्या जास्त असल्याने मतदान केंद्रे वाढली आहेत. विद्यापीठ प्रशासनाने निवडणुकीची तयारी पूर्ण केली आहे. पदवीधरसाठी ३६३४३ तर शिक्षकांसाठी ६४० मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणुकीसाठी विद्यापीठाने यादिवशी सुट्टी जाहीर केली आहे. १७० केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचा २५ वाहनांचा ताफा निवडणूक साधनसामग्रीसह रवाना झाला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही .एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.



## विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मतदान केंद्रे

कोल्हापूर जिल्ह्यात सायबर कॉलेज, कॉमर्स कॉलेज, श्री शहाजी महाविद्यालय, दसरा चौक, दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय, गारगोटी, देवचंद कॉलेज, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, डी. एस. कदम सायन्स कॉलेज जयसिंगपूर, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, वडगाव, श्री शिवशाहू महाविद्यालय, शाहूवाडी.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा १३ डिसेंबरपासून

## वेळापत्रक जाहीर : ४४८ अभ्यासक्रमांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील हिवाळी सत्रातील परीक्षांना १३ डिसेंबरपासून प्रारंभ होणार आहे. यात ४४८ अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागाने हिवाळी सत्र परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. पदवी स्तरावरील भाग २ व ३ तसेच पदव्युतर स्तरावरील भाग २ व ३ च्या तारखा जाहीर झाल्या आहेत. १३ डिसेंबरला बी.व्होक. कोर्सच्या परीक्षेने सुरुवात होईल. त्यानंतर बीए, बीएस्सी, बीसीएस, बीबीए, बीए बीएड, बीएस्सी फूड सायन्स, बीए मल्टीमिडिया, तीन व पाच वर्ष लॉ अभ्यासक्रम, एमबीए आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. यापूर्वीच अभ्यास मंडळाने निश्चित केलेल्या गुणांकन पद्धतीनुसार परीक्षा घेतल्या जाणार आहेत. स्वयम, कंपनी सेक्रेटरी, महाराष्ट्र सरकारच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या परीक्षेच्या दिवशी विद्यापीठाच्या कोणत्याही लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या जाणार नाहीत.

पुढारी

# भगवान महावीर अध्यासनास देणगी

कोल्हापूर : डॉ. कुबेर मगदूम यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी दहा हजार अशी बृहत देणगी अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांचेकडे सुपूर्द केली. अध्यासनाच्या इमारत बांधकामास दानशूर, अहिंसाप्रेमी व्यक्ती व संस्थांनी मदत करावी, असे आवाहन डॉ. ककडे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# कृषी विपणन : आजपासून राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : हैदराबाद येथील द इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल मार्केटिंग आणि शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विपणन विषयावरील ३६ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद सोमवार, दि. १४ ते बुधवार, दि. १६ नोव्हेंबर दरम्यान विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे, अशी माहिती डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी दिली.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ सिनेटसाठी आज मतदान

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळांसाठी सोमवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. पदवीधरसाठी ३६ हजार ३४३, तर शिक्षक गटासाठी ६४० मतदार पात्र आहेत. पदवीधरमधील वाढलेल्या नोंदणीमुळे यंदा मतदान केंद्रे ३३ केली आहेत. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार आहे. मतदार केंद्रांची नावे व तेथे होणारे मतदान यांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे उमेदवारांकडून मतदान केंद्राच्या परिसरातील मतदारांची जुळवाजुळव सुरू आहे. अधिसभेच्या १९ जागांसाठी ४५, विद्या परिषदेसाठी ९ शिक्षक, तर अभ्यास मंडळाच्या २७ जागांसाठी ४६ उमेदवार निवडणूक आहेत. दि. १७ रोजी मतमोजणी होणार आहे.

14 NOV 2022
जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीर अध्यासनास डॉ. मगदूम यांची देणगी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी डॉ. कुबेर मगदूम यांनी दहा हजार रुपयांची देणगी दिली. ही देणगी अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

अध्यासनाच्या इमारत बांधकामास सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

14 NOV 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ सिनेटसाठी आज मतदान

## बुधवारी मतमोजणी : कोल्हापूर, सांगलीसह साताऱ्यात ३३ मतदान केंद्रे

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांच्या (सिनेट) निवडणुकीसाठी उद्या (ता. १४) मतदान होत आहे. त्यासाठी १७० केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचा ताफा निवडणूक साधनसामग्रीसह आज रवाना झाला. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत ३३ केंद्रांवर मतदान होणार असून, मतमोजणी बुधवारी (ता.१६) होणार आहे.



शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, शिव-शाहू आघाडीअंतर्गत शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया, युवा सेना (ठाकरे गट), डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. प्रचाराने निवडणुकीची रंगत वाढली असून, विकास आघाडीचे निवडणुकीत वर्चस्व राखण्याचे प्रयत्न आहेत. पदवीधरमधून विकास आघाडीने नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. शिव-शाहू आघाडीनेही ईर्षेने निवडणूक लढविण्याची तयारी केली आहे. मतदारांपर्यंत ते पोचले असून, सोशल मीडियाद्वारेही त्यांनी उमेदवारांना पसंती क्रम देऊन निवडून देण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, मतदानासाठी आवश्यक साधनसामग्री घेऊन अधिकारी मतदान केंद्रांवर रवाना झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत २५ वाहने ठिकठिकाणी रवाना झाली.



**कोल्हापूर : विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी शिवाजी विद्यापीठातून रवाना झालेला केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचा ताफा.**

### जिल्हानिहाय मतदार संख्या

| | |
|---|---|
| कोल्हापूर | २५, ४८८ |
| सांगली | ७६४१ |
| सातारा | ३२१४ |
| एकूण | ३६३४३ |

### जिल्हानिहाय मतदान केंद्रे

- प्रत्येक जिल्ह्यात ११ केंद्रे
- **मतदान वेळ**

सकाळी ९ ते सायंकाळी ५

- **मतदारांकडे काय हवे ?**

मतदार क्रमांक, आधार कार्ड/ पॅन कार्ड/पासपोर्ट, वाहन परवाना यापैकी एक

- **कोल्हापुरातील मतदान केंद्रे**

सायबर, कॉमर्स कॉलेज व छत्रपती शाहू महाविद्यालय (सदर बाजार)

सकाळ






कोल्हापूर : लखनौ विद्यापीठातर्फे आयोजित राष्ट्रीय वनस्पतीशास्त्र परिषदेत डॉ. सचिन पाटील यांना सुवर्णपदक देताना उपस्थित मान्यवर.

# डॉ. सचिन पाटील यांना सुवर्णपदक

कोल्हापूर : लखनौ (उत्तर प्रदेश) येथील ऑल इंडिया बॉटनिकल सोसायटी आणि लखनौ विद्यापीठातर्फे आयोजित राष्ट्रीय वनस्पतीशास्त्र परिषदेत करंबळी (ता. गडहिंग्लज) येथील आणि शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभागात कार्यरत असणारे सहायक प्रा. डॉ. सचिन पाटील यांनी सुवर्णपदकाने गौरविले. डॉ. पाटील यांनी 'अपुष्प वनस्पतीचे वर्गीकरण आणि त्यांची जडणघडण' या संशोधनासाठी प्रा. एस. एन. दीक्षित सुवर्णपदकाने गौरवले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आर. वि. गुरव, डॉ. मीना डोंगरे, प्रा. डॉ. वर्षा जाधव, प्रा. डॉ. निखिल गायकवाड, डॉ. किशोर राजपूत, प्रा. विनय रावले, प्रा. संध्या किरण, करंबळी येथील ॲड. विकास अण्णा पाटील, अनुप पाटील यांचे सहकार्य लाभले.

14 NOV 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिनेट उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंद होणार


## कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रावर होणार मतदान

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाची निवडणूक कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रावर होणार आहे. विद्यापीठ विकास आघाडीच्या झेंड्याखाली विद्यापीठ विकास मंचसह, रयत शिक्षण संस्था आणि विवेकानंद शिक्षण संस्था यांच्या विरोधात सुटा आणि शिव-शाहू आघाडी निवडणूक रिंगणात आहे. तर शिक्षक संघात विकास आघाडीच्या विरोधात सुटा आणि पदवीधरमध्ये आघाडीच्या विरोधात शिव-शाहू आघाडीचे उमेदवार असे चित्र आहे. तरीही आम्हीच निवडून येणार असा दावा तिन्ही संघटनेच्या नेत्यांनी केला आहे. सिनेटच्या उमेदवारांचे भवितव्य आज (दि. १४) पतपेटीत बंद होणार आहे. विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी आज सकाळी ८ वाजता कोल्हापूर जिल्ह्यातील ११, सांगली जिल्हा ११ तर सातारा जिल्ह्यातील ११ एकूण ३३ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. कोल्हापूर शहरातील ३ मतदार केंद्रांचा समावेश आहे.

### जिल्हानिहाय मतदार



| पदवीधर मतदार | शिक्षक मतदार |
|---|---|
| कोल्हापूर : २५४८८ | कोल्हापूर : १३९७ |
| सांगली : ७६४२ | सांगली : ९०८ |
| सातारा : ३२१३ | सातारा : ६४० |

**आघाडीचे २६ हजार मतदार मतदान करणार**

पदवीधरमध्ये ३६३४३ मतदारांची नोंदणी झाल्यामुळे हे मतदान करून घेणे मोठे आव्हान आहे. तसेच विद्यापीठानेही मतदान असल्याने विद्यापीठ व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केल्याने जास्तीत जास्त मतदान होणार असा अंदाज आघाडीचे सहकार्यवाहक व्ही. एम. पाटील यांनी व्यक्त केला.

**सुटाचे मतदार उस्फुर्तपणे मतदान करणार**

सुटाचे शिक्षक मतदार नेहमीच उस्फुर्तपणे स्वखर्चाने मतदार केंद्रावर येवून मतदान करतात. त्यामुळे आमचे उमेदवार निवडून येणार, असा विश्वास सुटाचे कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी व्यक्त केला.

**मतपेट्या ३३ केंद्रावर रवाना**

विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी आज (दि. १४) रोजी सकाळी ८ वाजता तिन्ही जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. मतदान पेट्या घेवून १७० केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचा ताफा निवडणूक साधनसामग्रीसह रवाना झाल्या आहेत. मतदान सुरळीत पार पडावे म्हणून ३३ केंद्रावर पोलीस बंदोबस्त राहणार आहे. विद्यापीठ प्रशासनाने निवडणुकीची जय्यत तयारी केली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. दरम्यान बुधवार १६ नोव्हेंबर रोजी शिवाजी विद्यापीठातील परीक्षा भवनमध्ये मतमोजणी होणार आहे.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ संकेतस्थळावर माहिती उपलब्ध

शिवाजी विद्यापीठ ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२२ हिवाळी पदवी व पदव्युत्तर परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठ अधिविभाग व महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे परीक्षेच्या वेळापत्रकाची माहिती दिली आहे. तसेच विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर परीक्षेची संपूर्ण माहिती उपलब्ध आहे, याची दखल विद्यार्थी, अधिविभाग आणि महाविद्यालयांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

विद्यापीठ अंतर्गत बीव्होकची परीक्षा १३ डिसेंबरपासून, बीए, बीएस्सीची परीक्षा १४ डिसेंबर तर बीबीए, इंजिनिअरिंग, 



फार्मसी आणि लॉ. युजी प्रोग्रॅमची परीक्षा १५ डिसेंबर, बीसीएसची परीक्षा २० डिसेंबर, बीकॉमची परीक्षा २१ डिसेंबरपासून परीक्षेला सुरूवात होणार आहे. एमए, एमकॉम, एमएस्सी, इंजिनिअरिग फार्मसी, बीएड, एमएड, एलएलएमच्या परीक्षा १० जानेवारीपासून सुरूवात होणार आहे. या परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.